# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/१५१३/२०२४-२५ दि.१०/१०/२०२४

प्रति,
सिस्टीम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

महोदय,

सोबत जोडलेली प्रेस नोट महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.१०/१०/२०२४

**विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बहुमजली इमारती (G+4) वरील इमारतीना नवीन नळजोडणी मंजूरी बंद करणेबाबत...**

मिरा भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरणाकडून 80 द.ल.ली. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 125 द.ल.ली. असे एकूण 205 द.ल.ली. पाण्याचा कोटा प्रतिदिन मंजूर आहे. प्रत्यक्षात स्टेम प्राधिकरणाकडून 75 द.ल.ली. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 117 द.ल.ली. असे सरासरी एकूण 192 द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

सध्याच्या शहराच्या लोकसंख्येनूसार दरडोई दरमाणसी 150 लीटर याप्रमाणे शहरास सुमारे 235 द.ल.ली. प्रतिदिन पाण्याची गरज आहे व प्रत्यक्षात 192 द.ल.ली. पाणी पुरवठा होत असल्याने सद्यस्थितीत सुमारे 43 द.ल.ली. प्रतिदिन पाण्याची मागणी व पुरवठा यामध्ये तफावत आहे. तसेच मंजूर कोट्याप्रमाणे पाणी शहरास उपलब्ध होणेकरीता पत्रव्यवहार सुरु आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा स्वत:चा असा जलसाठा नसल्याने महानगरपालिकेस स्टेम व एम.आय.डी.सी. या संस्थेमार्फत पाणी घ्यावे लागते. सदर संस्थेमार्फत प्रतिबंधात्मक देखभाल, दुरुस्ती, मुख्य जलवाहिनीवर अचानक झालेली गळती थांबवण्याकरिता, तसेच पावसाळ्याच्या दिवसात पंपाच्या स्ट्रेनरमध्ये आलेला कचरा काढण्यासाठी शटडाऊन घेतले जातात. सदर शटडाऊन घेतल्याने 24 ते 30 तासांकरिता पाणी पुरवठा बंद होत असतो. त्यानंतर पाणी पुरवठा पुर्वपदावर येण्यासाठी जवळपास 48 तासांचा कालावधी लागतो. कारण मिरा-भाईंदर शहर हे पाण्याच्या स्त्रोतापासून सुमारे 50 कि.मी. दुर तसेच पाणी पुरवठा योजनेच्या शेवटच्या टोकाला आहे. तसेच जर पाणी पुरवठा करणाऱ्या दोन्ही संस्थांनी सलगच्या आठवड्यात शटडाऊन घेतल्यास पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी 3 ते 4 दिवसाचा कालावधी लागतो.

सुर्या प्रकल्पाचे काम एम.एम.आर.डी.ए. मार्फत युद्धपातळीवर सुरू असून काम पुर्ण होऊन मिरा भाईंदर शहरास मुबलक पाणी पुरवठा होण्यास आणखी काही कालावधी लागणार आहे. सदर कामे पुर्ण झाल्यानंतर शहराचा पाणीपुरवठयात सुधारणात होण्यास मदत होणार आहे.

सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि.10/10/2024 अखेर एकुण 45,975 इतक्या जलजोडण्या आहेत. जलजोडण्या वाढल्यामुळे अस्तित्वात असलेल्या जलवाहीनीवरील पाण्याचा दाब कमी होत असून जलजोडणीव्दारे होणारा पाणी पुरवठा कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे जलजोडणीधारकाच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. सध्या शहरात 40 ते 45 तासाने पाणी पुरवठा केला जात आहे. तसेच काही तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा खंडीत झाल्यास पाणी पुरवठा हा 50 ते 60 तासांवर जात असतो. सदर पाणी पुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असल्याने सतत या विभागाकडे स्थानिक रहिवाशी, समाजसेवक, मा. नगरसेवक व नगरसेविका तसेच लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी प्राप्त होत असून त्यांच्या तीव्र रोषास सामोरे जावे लागत आहे.

यास्तव शहरास सुर्या प्रकल्प योजनेअंतर्गत 218 द.ल.ली. पाणी पुरवठा सुरु होईपर्यंत बहुमजली इमारती (G+4) वरील इमारतींना नवीन नळजोडणी मंजूरीस स्थगिती देण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने)**

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
मिरा-भाईंदर महानगरपालिका